# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १७६ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०५ भाद्र. शके १९४८, गुरूवार दि.२७ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शासकीय रुग्णालयांना आगीचा विळखा: यंत्रणा कधी सुधरणार?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शासकीय रुग्णालयांना लागणाऱ्या आगीच्या घटना ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे. अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशु केअर युनिट मध्ये झालेल्या व्हेंटिलेटर स्फोटामुळे तीन निष्पाप बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ही व्यवस्था सुधारण्यासाठी तातडीने आणि ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

दवाखान्यांमध्ये वारंवार लागणाऱ्या आगी आणि त्यामध्ये निष्पाप रुग्णांचे जाणारे बळी ही अत्यंत गंभीर, चिंताजनक आणि वेदनादायी बाब आहे. हॉस्पिटलमधील रुग्ण हे स्वतःचे रक्षण करण्यास असमर्थ किंवा अंथरुणाला खिळलेले असतात, त्यामुळे अशा ठिकाणी आगीच्या घटना घडणे हा मोठा गुन्हा ठरतो.

महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमध्ये वारंवार घडणाऱ्या आगीच्या दुर्घटना अतिशय चिंताजनक आणि दुर्दैवी आहेत. अमरावतीतील अतिदक्षता विभागात नुकत्याच लागलेल्या आगीच्या घटनेत तीन नवजात बालकांचा बळी गेला.अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशू कक्षात व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन ही आग लागली. ही आग वेगाने पसरली. यानंतर रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी शिशू कक्षात असलेल्या बालकांना बाहेर काढले. ही घटना घडली तेव्हा या कक्षात ९ बालके होती. मात्र, तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. उर्वरित बालकांसह संपूर्ण नवजात शिशू कक्षातील इतर बालकांना जवळच असलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

अमरावती जिल्हा रुग्णालयाच्या आधी राज्यात अनेक शासकीय दवाखान्यांमध्ये आग लागल्याच्या घटना घडल्या,मात्र या घटनांपासून ना सरकारने ना प्रशासनाने ना शासकीय रुग्णालयांनी काळजी घेतली .सर्व कारभार रामभरोसे सुरू आहेत. एखादी दुर्घटना घडल्यानंतर वेळी सावध व्हायला पाहिजे मात्र या संरचनेतील कुठलाच घटक सावध होत नाही. सर्व बेजबाबदारपणे वागतात.

रुग्णालयात आग लागून दुर्घटना होण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी अशा अनेक दुर्घटना घडल्या असून त्यात अर्भके तसेच रुग्णांचे मृत्यू झाले आहेत. मात्र, आजही परिस्थिती बदलली नाही. दुर्घटना घडते, चौकशी होते, अहवाल येतो, शिफारसी सुचवल्या जातात. त्यानंतर काय होते, कुणालाच कळत नाही. पुढे दुसरी दुर्घटना होते. अशा घटनांमधून यंत्रणा अजिबात गंभीर नसून कुणालाही जीवाचे मोल कळत नसल्याचे लक्षात येते.

भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात ९ जानेवारी २०२१ रोजी रात्रीच्या सुमारास अतिदक्षता नवजात शिशू केअर युनिटमध्ये शॉर्ट सर्किट किंवा एअर कंडिशनरमधील बिघाडामुळे लागलेल्या आगीत १० नवजात बालकांचा मृत्यू झाला होता.अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयात नोव्हेंबर २०२१ मध्ये येथील अतिदक्षता विभागाला लागलेल्या भीषण आगीत ११ रुग्णांचा मृत्यू झाला होता.कमला नेहरू चिल्ड्रन्स हॉस्पिटल, भोपाळ (मध्य प्रदेश): नोव्हेंबर २०२१ मध्ये या शासकीय रुग्णालयातील बालकांच्या विशेष काळजी कक्षात लागलेल्या आगीत ४ नवजात बालकांचा जीव गेला होता.

शासकीय रुग्णालयांमधील आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी शासनाने नियम केले आहेत, परंतु प्रशासनाच्या ढिसाळ अंमलबजावणीमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न कायम आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये लागणाऱ्या आगीच्या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे जनतेमध्ये अत्यंत तीव्र संताप आणि काळजीचे वातावरण आहे.रुग्णालयांमधील आगीच्या दुर्घटना ही अत्यंत गंभीर आणि दुर्दैवी बाब असून, यंत्रणेच्या ढिसाळ कारभारावर यामुळे मोठा प्रश्नचिन्ह निर्माण होतो.

शासकीय रुग्णालयांमधील असुरक्षिततेची कारणांमध्ये रक्षकांची कमतरता, पायाभूत सुविधा आणि फायर ऑडिटचा अभाव, अपुरे मनुष्य बळ, या प्रमुख कारणांचा उल्लेख करता येईल.

रुग्णालयाच्या अवाढव्य परिसराच्या तुलनेत तैनात असलेले सुरक्षा रक्षक अत्यंत कमी आहेत. वेळेवर फायर ऑडिट न होणे किंवा तांत्रिक उपकरणांची दुरुस्ती न झाल्याने अमरावतीसारखे मोठे अपघात घडतात.डॉक्टर्स आणि खाटांची संख्या कमी असल्याने रुग्णांवर वेळेत उपचार होण्यास उशीर होतो, ज्यामुळे नातेवाईकांचा संयम सुटतो.नातेवाईकांची अनिबंध गर्दी: अतिदक्षता विभाग किंवा वॉर्डमध्ये एका रुग्णासोबत अनेक नातेवाईक एकत्र आल्याने गोंधळ वाढतो.

प्रशासकीय उदासीनतेचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे, भंडारा दुर्घटनेनंतर शासकीय रुग्णालयांच्या अग्निसुरक्षेसाठी करोडो रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि आरोग्य विभाग यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे आणि तांत्रिक त्रुटींमुळे चंद्रपूरसारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये मंजूर झालेला कोट्यवधींचा निधी परत गेला, ज्यामुळे कामे अंतिम टप्प्यात रखडली आहेत.जोपर्यंत सरकार फायर ऑडिटच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करत नाही आणि यंत्रणा कागदावरून प्रत्यक्ष रुग्णालयात कार्यक्षम करत नाही, तोपर्यंत अशा दुर्घटना थांबणार नाहीत.

शासकीय रुग्णालयांमधील आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी प्रशासकीय अनास्था संपवून तात्काळ तांत्रिक आणि रचनात्मक सुधारणांची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

# रस्ता सुरक्षेसाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करणे काळाची गरज

## आयएसटीडी संभाजीनगर चॅप्टरतर्फे 'रोड सेफ्टी अवेअरनेस' सत्र; आरटीओ अधिकाऱ्यांसह मान्यवरांची उपस्थिती

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – वाढते रस्ते अपघात, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि वाहनचालकांकडून होणाऱ्या निष्काळजीपणाच्या पार्श्वभूमीवर रस्ता सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रत्येक वाहनचालकाने वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून जबाबदारीने वाहन चालविले, तर अनेक अपघात टाळता येऊ शकतात. रस्ता सुरक्षा ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन समृद्धी महामार्गाचे समन्वयक तथा आयएसटीडी चे रिजनल व्हाईस प्रेसिडेंट (वेस्ट) डॉ. सुरेंद्र गेडाम यांनी केले.



इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट (आयएसटीडी), छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या वतीने मंगळवारी (२५ ऑगस्ट) येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयात 'रोड सेफ्टी' या विषयावर विशेष जनजागृतीपर व मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास आरटीओ अधिकारी पूजा वानखेडे, आयएसटीडी छत्रपती संभाजीनगर चॅप्टरचे चेअरपर्सन प्रा. जयप्रकाश बागडे, सेक्रेटरी अशोक गुरनाळे, सखाराम नन्नावरे, तसेच हेडगेवार रुग्णालयाचे एचआर हेड रविंद्र कोल्हारकर आणि रविंद्र इंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सुरेंद्र गेडाम यांनी आपल्या मार्गदर्शनात रस्ता सुरक्षेचे महत्त्व स्पष्ट करताना वाहन चालविताना संयम, शिस्त आणि जबाबदारी या तीन बाबींना विशेष महत्त्व असल्याचे सांगितले. वाहनाचा वेग मर्यादेत ठेवणे, हेल्मेटचा योग्य वापर करणे, चारचाकी वाहनांमध्ये सीट बेल्ट लावणे, सिग्नलचे पालन करणे, वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर न करणे आणि मद्यपान करून वाहन न चालविणे या बाबी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याचे आवाहन त्यांनी केले. आरटीओ अधिकारी पूजा वानखेडे यांनी वाहतूक नियम, वाहनचालकांची कायदेशीर व सामाजिक जबाबदारी, रस्त्यावरील शिस्त आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असून, नियमांचे पालन केल्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्यास मोठी मदत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

रस्त्यावर वाहन चालविताना केवळ स्वतःच्या सुरक्षिततेचा विचार न करता पादचारी, दुचाकीस्वार, सायकलस्वार आणि इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेचीही काळजी घेणे आवश्यक आहे. छोट्या स्वरूपाचे वाटणारे वाहतूक नियमांचे उल्लंघनदेखील गंभीर अपघाताला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे सुरक्षित वाहनचालकत्वाची संस्कृती निर्माण करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सत्रादरम्यान अपघात प्रतिबंध, सुरक्षित ड्रायव्हिंग, वाहतूक शिस्त, आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद आणि अपघातग्रस्तांना तातडीने मदत या विषयांवरही चर्चा करण्यात आली. उपस्थितांनी विविध प्रश्न विचारून आपले अनुभव मांडले. त्यामुळे हे सत्र केवळ व्याख्यान न राहता संवादात्मक व अनुभवाधारित मार्गदर्शनपर कार्यक्रम ठरले.

रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी आयएसटीडी छत्रपती संभाजीनगर चॅप्टरतर्फे आयोजित या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. सुरुवातीस हेडगेवार रुग्णालयाचे एचआर हेड श्री. रवींद्र मुकुंद कोल्हारकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या शेवटी रविंद्र इंगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास आयएसटीडी सदस्य, हेडगेवार रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयएसटीडी छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मायेच्या हरवलेल्या त्या सावल्या....

**ज्योतिर्मय साहित्य**


मध्यान्हीच्या त्या प्रहाराला सहज म्हणून बाहेर पडले होते. हवेतला तो गारवा अंगाला शिरशिरी आणत होता. हरवलेला मामाचा गाव आजचा विषय, काय बरे लिहावे! विचारांच्या तंद्रीत चालत असताना नुकतीच कोसळून गेलेली ती सर आणि शेजारच्या शेतातल्या पिकांच्या पानांवर पडलेलं ते सोनेरी ऊन त्यावरून उडत जाणारे ते करड्या रंगाचे ते पाखरू भुर्रकन उडून जात होते. आणि हलणारी ती पाने कवी मनाला भुरळ घालत होती.

आपोआप तोंडून आले. वाहवा! किती सुंदर हा नजारा अहाहा!

पळणाऱ्या त्या ढगाला
कोणी धक्का जणू दिला,
रडू.. रडू.. मायच्या मायेपोटी
जणू धरेवारी काकुळतीला आला.

आणि एवढ्यात वाऱ्याची मंद झुळूक आली नि दवांची त्या बरसात ओली आणि आठवण झाली ती तेव्हांची..

कृष्णेच्या काठाची मंद झुळूक आली,
त्या मंद झुळुकेने काढली माझी खोडी.
आजही आठवते ती वाट नागमोडी
माडांच्या दाटीतून पळते झुक झुक् गाडी.



गावंधरीच्या ओढ्यात सु बाभाळ एक वेडी
चिंचेच्या झाडावर घुमते भालघुरामची जोडी.

...भर दुपारच्या त्या उन्हाच्या काहिलीतून खळखळ आवाज करत मातीच्या त्या पाटातून जाणारे तेंव्हाचे ते पाणी आजही आठवते. एस टी तून उतरून नांदगावच्या त्या पुलावरून मामाच्या घरी जाताना भेटलेला तो मामा कोण होता नाही माहीत, मध्यान्ही च्या उन्हाची ती परिभाषा त्या ऊन सावल्या निहाळताना ''कशी आहेस ग आक्का'' एक आक्का सगळ्या गावची आक्का होती. उन्हाच्या काहिलीतून सावलीचे ते दोन निवांत क्षण अनुभवताना खऱ्या शीतलाईची जाणीव आजही होते. असे ते दोन प्रेमाचे शब्द आज तो मामा कुठे कसा असेल माहित नाही पण वळण वेड्या वाटेने धावताना अशी किती नाती आयुष्यात येतात हो ना!

कृष्णामाईच्या पुलावरून जाताना नदीच्या त्या पाण्यात टाकलेले ते नाणे आज..? खरंच तिथेच असेल का!की.., काळाच्या प्रवाहात ते कुठे असेल? गावंधरीच्या ओढ्यात असलेली ती एकटीच सु बाभळ आणि तिची पडलेली ती वाळकी सावली, तिच्या शेंड्यात आलेली हिरवीगार कोवळी पाने कधी केंव्हा नष्ट झाली हे कधी कळलेच नाही. तिच्या शेजारी असणारी चिंच तिच्या मातीतून वर आलेल्या मुळ्या नेहमी मला प्रश्नात पडायच्या.





तिच्या खाली असलेला तो छोटा ओढा त्या उंच उतारावर अन् त्या ओढ्यात पडलेला तो चिंचेच्या झाडाचा छोट्या छोट्या पिवळसर पानांचा सडा काही झाडाच्या बुंध्यापाशी असायचा नि काही त्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून पुढच्या रस्त्याला लागलेला दिसायचा.अन् आवाज यायचा तो म्हणजे त्या भालघुरामचा अन् त्याला पाहण्याची ती उत्सुकता शिगेला पोहचायची,आणि तो दिसल्यानंतर आज काहीतरी छान गोड खायला मिळणार म्हणून मनाला खूप आनंद व्हायचा. आणि मग तंद्री मोडायची ती त्या खळाळणाऱ्या त्या छोट्या ओढ्यातील पाण्याने

अशाच त्या प्रवाहाबरोबर चिंचेच्या झाडावर येणाऱ्या भारद्वाज ही नकळत केंव्हा उडून गेला ते कळले नाही.

अंकुरेल बहरेल जाई जुई वेलीवरी
दूर उडाली पाखरे येतील मागल्या दारी,
अजब रीत संसारी त्याला संसाराची गोडी.
किलकिल्या डोळ्यात वाट पाहते माया ती वेडी. **(क्रमशः)**


## श्रेया घोषाल यांची ''आशा भोसले'' पुरस्कारासाठी निवड

**ज्योतिर्मय साहित्य**



पुणे – अ. भा. मराठी नाट्य परिषद (पिंपरी चिंचवड शाखा), पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा ''आशा भोसले'' या मानाच्या पुरस्कासाठी ख्यातनाम गायिका श्रेया घोषाल हिची निवड करण्यात आली आहे. एक लाख अकरा हजार रुपये, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून शनिवार दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती अ. भा. मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या सोहळ्याला विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे, ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, आ. अमित गोरखे, मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने मोरया थिएटर निर्मित '' आशा से श्रेया तक '' या सदाबहार गीतांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा विनामूल्य असून पिंपरी चिंचवड शहरातील रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन भाऊसाहेब भोईर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला आ. भा. नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे उपाध्यक्ष किरण येवलेकर तसेच गौरी लोंढे, सुदाम परब, राजेंद्र बंग, संतोष शिंदे, संतोष रासने आदी पदाधिकारी उपस्थित होते.




# जात्यावरच्या ओव्या......

आज दमले दमले
द्या ना पेलाभर पाणी
चार लेकराची माय
एका राजाची राणी ||८१६||

आज दमले दमले
बसते गार हवेला
हाती कपभर चहा
काय पाहिजे जीवाला ||८१७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६६




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

एकदा सत्य लक्षात आल्यानंतर मग त्यातून बाहेर पडण्याचा उपाय करता येतो. संसार करताना आपल्या लक्षात येतं की आपल्याला समजायला लागल्यापांसून आपण या प्रपंचात किती गुंतत चाललो आहोत. सगळ्यांची मने सांभाळताना आपली किती ओढाताण होते आहे ! किती दिवस ही लटकी नाती जपायची ? कोणाकोणाचा अहंकार जपायचा ?पैसा कमवायचा तरी किती ? किती पैसा मिळवला म्हणजे तो पुरे झाला असे होते ? ही संपत्ती, हे घरदार मी कोणासाठी कमावतो आहे ? हे सगळे तर इथेच ठेऊन जावे लागणार आहे. आपल्यापुढे दोनच पर्याय असतात. एकतर ठेऊन जा, नाहीतर देऊन जा. बरोबर घेऊन जाण्याचा पर्याय आपल्याला परमेश्वराने दिलेला नाही. बरं, ज्यांच्यासाठी हे सर्व करावं, ती पोरंबाळं तरी नंतर आपल्याला विचारतील याची काय खात्री आहे ? गेल्यानंतर काही दिवस आपली तसबीर भिंतीवर लागेल. तिची पूजा होईल. काही दिवसांनी तीही निघून जाईल. हे जगच अनित्य आणि मर्त्य आहे. आधीच्या श्लोकांत समर्थांनी सांगितल्यानुसार मरे एक त्याचा दुजा शोक वाहे, अकस्मात तोही पुढे जात आहे. अशी परिस्थिती असते. तरी आपल्याला केवढा गर्व असतो, आपल्या पैशाचा, रूपाचा, सत्तेचा !



हा सगळा विचार कदाचित कोणाला निराशावादी वाटण्याची शक्यता आहे. पण वस्तुस्थितीकडे डोळेझाक केली तरी वस्तुस्थिती थोडीच बदलते ! उलट वस्तुस्थिती समजली तर त्यातून बाहेर पडण्याचा उपाय करता येतो. यावर एकच उपाय आहे. असार संसाराला बाजूला सारून जे सार म्हणजे रामनाम आहे, तेच जीवी धरावे. धान्य पाखडण्याचे सूप आपल्याला माहिती असेल. धान्य पाखडताना ते त्यातील असार म्हणजे खडे, केरकचरा आदी बाहेर टाकून देते. आणि सार म्हणजे जे धान्य आहे ते धरून ठेवते. आपणही सुपाची भूमिका करावी. असार सर्व सोडून द्यावे आणि सार म्हणजे भगवंत त्यालाच घट्ट धरून ठेवावे. रामरायाचे ध्यान सर्व सुख देणारे आहे. ते मंगल दर्शन पूर्णविराम असे आहे. '' म्हणून हे मना, या राघवाचे ध्यान कर ''असे समर्थ तळमळीने आपल्याला सांगत आहेत.

स्वसंवाद : १) मी संसार करताना त्यात अडकतो आहे का, की त्याकडे साक्षीभावाने पाहतो आहे? २) ''विष'' म्हणून सांगितलेली विषयासक्ती माझ्या जीवनात कोणत्या रूपात आहे? ३) मी इतरांच्या अनुभवातून शिकतो का, की स्वतः धडपडूनच शिकतो? ४) माझ्या आयुष्यात ''सार'' आणि ''असार'' यातील फरक मला स्पष्टपणे कळतो का? ५) मी रोजच्या जीवनात भगवंताच्या स्मरणासाठी वेळ काढतो का, की तो पुढे ढकलतो?

(क्रमशः)



# || अभंग-माधव ||

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



---------- सज्जन ----------

स्पर्धा ती आपली । स्वतःशी असावी ।
दुजाशी नसावी । कदापिही ॥१॥
श्रेष्ठत्व आपुले । सिद्ध ते करावे ।
जगी ह्या उरावे । स्व नावाने ॥२॥
आपुल्या माघारी । म्हणावे जनांनी ।
होता हा सद्गुणी । खरोखर ॥३॥
माधव हा म्हणे । नाव कमवावे ।
लोकांनी म्हणावे । हा सज्जन ॥४॥


# || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

रोज कोणतेही एक तरी काम असे करावे ज्यामध्ये आपला काहीचं स्वार्थ नसावा. हे खूप पुण्याचे काम असेल. यातील फायदा न दिसणारा असतो पण तो तुम्हाला भविष्यात भरपूर काही देऊन जाईल.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नित्यनेम करणे म्हणजे काय ?

ज्योतिर्मय साहित्य

नित्यनेम करणे म्हणजे सर्वकाळ नित्यात राहणे. आपण मुळात स्वतःच नित्य असून अनित्यात राहिलो आहोत. नित्य जो परमात्मा त्याला विसरून, विषय जे अनित्य त्यात पडल्यामुळे आपल्याला त्याची आठवण होत नाही. त्याची ज्यामुळे आठवण होईल असे जे करणे त्याला नित्यनेम म्हणतात. आपण नेहमीच नित्यनेमात असावे, पण तसे होत नाही; म्हणून दिवसातून थोडा वेळ तरी त्याची आठवण होण्याकरिता काही वाचन आणि वाचलेल्याचे मनन करावे, म्हणजे त्याची सवय होते. जो अखंड नामस्मरण करतो तो नेहमीच नित्यनेमात असतो. नित्यनेम खरा कोणी केला असेल तर तो ब्रह्मानंदबुवांनीच. आपल्याला सदा नामात कसे राहता येईल याचा आपण विचार करावा. याकरिता गुरुआज्ञा प्रमाण मानणे हेच खरे साधन आहे. गुरू सांगेल तोच नित्यनेम होय. त्याला शरण जावे. रोज थोडेसे वाचन, त्यानंतर मनन, मननानंतर त्याप्रमाणे आचरण, आणि शेवटी गुरूस अनन्यशरण, हाच साधकाचा साधनक्रम आहे आणि हाच त्याचा नित्यनेम होय.

आपले आयुष्य जसजसे वाढत जाईल तसतशी साधकाची भगवंताला भेटण्याची उत्सुकता वाढत गेली पाहिजे. केवळ नेम आहे म्हणून उगीच करू नये; साधकाने कोणतीही गोष्ट मनापासून करायला शिकावे. साशंक वृत्तीने परमार्थात बिघडते हे ध्यानात ठेवावे. श्रद्धा हे परमार्थाचे मुख्य भांडवल होय. समाधान हेच सर्वस्व आहे अशी श्रद्धा ठेवावी. ज्याप्रमाणे थर्मामीटरने आपला ताप आपल्याला पाहता येतो, त्याप्रमाणे साधन करताना आपले आपल्याला समाधान किती झाले हे पाहिले पाहिजे. साधकाने जगातले दोष पाहू नयेत, कारण त्या दोषांचे बीज आपल्यामध्येच असते. लोकेषणा, मान फार घातक आहेत. मोठमोठे साधकसुद्धा त्यांच्यापायी अधोगतीला जातात. तसेच पैसा आणि कामवासना यांच्या मर्यादा ओलांडल्यामुळे मोठे साधनी लोकसुद्धा भगवंताच्या जवळ येऊन घसरतात. जगातले हे सर्व पाश आपल्याला बंधनात पाडतात. भगवंताचा पाश हाच खरा पाश. तोच आपल्याला सर्व बंधनांपासून मुक्त करून शाश्वत समाधानाचा लाभ मिळवून देतो.

जगाच्या मान-अपमानाला कधी भुलू नये. पैसा आणि कामवासना यांच्यापेक्षाही मान हा देहबुद्धीला जास्त चिकटून आहे. तिथे अगदी सावध असावे. जिथे आपल्याला मान मिळण्याचा संभव आहे तिथे जायचे टाळावे. टाळणे शक्य नसले तर 'हे भगवंताचे देणे आहे' असे मनापासून समजावे. जो खरा मोठा असतो तो कधी मानाची इच्छा धरीत नाही, आणि मान त्याच्याकडे आला तर त्याची क्षिती बाळगत नाही. आपल्याला मान आवडतो का ते पाहावे, म्हणजे त्यावरून आपल्या अंगी खरे मोठेपण किती आहे हे आपल्याला कळेल. जाता-येता देवाला नमस्कार करावा, 'राम, राम' म्हणावे. भगवंताचे प्रेम एकदा लागले की ते पुन: सुटणार नाही.

भगवंताचा पाश हा पाशच खरा. पण तो आपल्याला बंधनापासून मुक्त करतो.

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



पुढे.....

मंदिराचे शिखरावर 176 शिल्पे कोरली आहेत. गर्भ गृहाचा दरवाजा पितळी आहे. गाभाऱ्याच्या ललाट बिंदूवर श्री गणेशाची प्रतिमा आहे. मंदिराच्या भिंतीवर मारुती राय शेषशाही विष्णू यांच्या शुभ प्रतिमा कोरलेल्या आहेत. मंदिराचे शिखर 70 फूट उंच आहे.

**मंदिरातील विशाल घंटा**

ही घंटा वसई येथे पोर्तुगीज लोकांच्या चर्च साठी बनवली होती. वसई विजयात ती मराठ्यांच्या ताब्यात आली. आणि तिथे प्रतिष्ठित करण्यात आली.

**नरसिंह भगवंताचा विग्रह**

भक्त प्रल्हादाने पुजलेली ही मूर्ती दोन्ही हात मांडीवर ठेवून विरासन मुद्रेत असून, समोरच्या मंदिरातील भक्त प्रल्हाद यांच्या मूर्तीकडे, व भक्तांकडे भगवान नृसिंह अत्यंत करुणेने पहात असल्याचे दिसते. या मूर्तीच्या डाव्या बाजूला असलेल्या गर्भगृहात भगवान ब्रह्मदेवांनी पुजलेली, अत्यंत प्राचीन अशी श्री नरसिंह शाम राजाची (शांत भाव असलेली असल्यामुळे हिला शाम राज असे म्हणतात.) उत्तराभिमुख मूर्ती आहे. हे देवस्थान अत्यंत जागृत आहे. (क्रमश:)





## त्याग आणि त्याचे स्वरूप

मित्रांनो, आज मी तुम्हाला एका अडीच अक्षरी शब्दाचे महत्व, त्याचे प्रकार,त्याचे स्वरूप व परिणाम सांगतो. तो शब्द म्हणजे"त्याग" हा शब्द आपण रोज ऐकतो, वाचतो व वापरत असतो.आपल्या मराठीत हा शब्द अनेक प्रकारे, दुहेरी अर्थाने वापरतात.शब्दाच्या आधी व नंतरही जसे अन्नत्याग, गृहत्याग त्यागपूर्ण,त्यागामुले इ.इ. आणि हा शब्द दुहेरी व नाना अर्थी वापरतात!सर्वांना समजण्यासाठी सोपा अर्थ म्हणजे "त्याग करणे"म्हणजे सोडणे, वर्ज करणे होय. पण कोणत्याही त्यागाला जीवनात ऊच्च स्थान आहे. त्याग म्हणजे आपल्याआधी दुसर्याचा विचार, निश्चिंत भावनेने केलेली कृती व कार्य म्हणजे त्याग!सीमेवरील जवान व सैनिकांचा त्याग तर आपण जाणतोच.खरे तर त्याग म्हणजे आसक्ती सुटणे. त्यागासाठी माझ्या मते संयम पाहिजे.त्यातूनच अनिच्छा निर्माण होते. पण वाचकहो इथं एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, त्याग हा सत्य,परोपकार व अहिंसेसाठी हवा जे म.गांधीनी केले.सामाजिक व स्वातंत्र्यसेनानी यांच्या त्यागातूनच स्वातंत्र्य मिळाले.त्यागाचा विरूद्धार्थी शब्द आहे स्वार्थ म्हणूनच गीता म्हणते "त्यागात शांती निरंतरम्:" आणि सोडल्या शिवाय शांती येऊच शकत नाही. संतुष्टीच त्यागाची बैठक असायला हवी.रामायणात तर पदोपदी व प्रत्येक व्यक्ती त्याग करताना दिसते नाही का?तर आज एवढे पुरे..येथे थांबतो. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. स्वस्थ राहा मस्त राहा.आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.सुप्रभात.



# || श्री दत्त महिमा ||



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड

## दुर्मिळ श्री दत्त यंत्र

ज्योतिर्मय साहित्य

दत्त संप्रदायामध्ये मंत्र तंत्र यंत्र ही विद्या अधिक प्रचलित आहे ज्यामध्ये तंत्र मंत्र या विद्येचा जास्त वापर गुरु मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ यांनी नाथ संप्रदायात अधिक प्रकारे प्रचार आणि प्रसार केला

आपल्या हिंदू धर्मात अनेक देवता यांची यंत्र उपलब्ध आहेत जसे गणेश यंत्र देवी यंत्र काळभैरव यंत्र त्याचप्रमाणे दत्त संप्रदायातील दत्त यंत्र देखील अस्तित्वात आहेत ही यंत्र साधना अनेक पटीने फलदायक असते असेच एक दत्त यंत्र आद्यपीठ श्री वरद दत्त संस्थान येथे स्थापित आहे मूळ दत्त मंदिराच्या शिरोभागावर एक पाषाणातील कोरीव काम व त्यावर शिलालेख कोरलेले आहेत.

हे दत्त यंत्र त्रिस्तरीय असून त्यावर पहिल्या स्तरावर दत्त यंत्र दुसऱ्या स्तरावर श्री गुरवे नमः व तिसऱ्या स्तरावर श्री वरद दत्तात्रेय असे कोरलेले आहे मुख्य भागावर अष्टकमलदल सहित एक तारका विराजमान आहे.

संपूर्ण कमलदल एका वर्तुळाने पूर्ण केलेले आहे.

अवकाशातील गुरु तत्व केंद्रित करून त्याचा संचय दत्त यंत्रामधे केला



जातो व त्याचा लाभ पूजक अर्चक यांना व्हावा यासाठी या यंत्राची रचना केलेली असते यंत्र पूजे नंतर साधकास अध्यात्मिक प्रापंचीक आरोग्य विषयक उन्नती साधता येते असे अनुभव आहेत त्यामुळे यंत्र साधना अतिशय प्रभावी असते साधारणतः देवतेच्या

पुजन विधीमध्ये मूर्ती पुजन, पादुका पुजन, यंत्र पुजन

अशी रचना असते या स्थानी तीनही गोष्टींचा प्रभाव दिसतो कारण या स्थानी वरद दत्त मूर्तीही आहे चरणपादुका ही आहेत व दत्त यंत्र देखील अस्तित्वात आहे तीनही प्रकारच्या पूजा या स्थानी सिद्ध करता येतात म्हणून हे दत्तसंप्रदायातील एक प्राचीन दुर्मिळ स्थान आहे दत्तभक्तांना याची फारशी माहिती नाही यासाठी हा लेखन प्रपंच सर्वांनी याचा लाभ घ्यावा ही अपेक्षा गुरुदेव दत्त कृपा करा

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### शब्द

शब्द असती पहा
धारदार असे शस्त्र
जपून जरा वापरावे
वेळ निघून गेल्यावर
सर्वकाही संपते म्हणून
वेळीच खरे सावरावे

शब्दांचे आहेत इथे
सर्वजण खरे पूजारी
दौलत सुंदर,छान
शब्द असे आधार
सारस्वतांचा तेच श्वास
पूजनाचा खास मान

# वाघिरे महाविद्यालयात पीएच.डी. कोर्सवर्कचा समारोप




**ज्योतिर्मय साहित्य**

सासवड - पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड येथील रसायनशास्त्र विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने पीएच. डी. कोर्सवर्क-२०२६ या अभ्यासक्रमाचा समारोप समारंभ सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण आणि शैक्षणिक वातावरणात संपन्न झाला. ८ जून २०२६ ते १४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या कोर्सवर्कमध्ये ३८ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती, प्रगत विश्लेषणात्मक तंत्रे, संशोधन नैतिकता, साहित्य समीक्षा, वैज्ञानिक लेखन, संशोधनातील आधुनिक साधने आणि विविध अत्याधुनिक विश्लेषणात्मक तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बी. एल. शिंदे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी पीएच.डी. कोर्सवर्कच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करताना संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनाच्या मूलभूत संकल्पनांपासून अत्याधुनिक संशोधन पद्धतींपर्यंत विविध विषयांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. रावसाहेब लटपटे, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनाच्या पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी संशोधनामध्ये नावीन्य, सातत्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, अचूकता, संशोधन नैतिकता आणि गुणवत्तेला* विशेष महत्त्व असल्याचे स्पष्ट केले. संशोधकांनी केवळ पदवी मिळविण्याच्या उद्देशाने नव्हे, तर समाज आणि राष्ट्राच्या विकासाला हातभार लावणारे गुणवत्तापूर्ण व उपयुक्त संशोधन करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयातील अद्ययावत घडामोडींचा सतत अभ्यास करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन करण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित शेळके यांनी पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील संशोधन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयामध्ये संशोधनासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी रसायनशास्त्र विभाग व संशोधन केंद्र सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी कोर्सवर्कदरम्यान प्राप्त केलेले ज्ञान आपल्या संशोधनामध्ये प्रभावीपणे वापरून दर्जेदार संशोधन प्रकाशित करावे आणि महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी केले. ८ जून ते १४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या कोर्सवर्कमध्ये विविध विषयांवरील तज्ज्ञांची व्याख्याने, मार्गदर्शनपर सत्रे, संशोधनविषयक चर्चा, सादरीकरणे आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले. संस्था पदाधिकारी, प्राचार्य डॉ. पंडित शेळके, उपप्राचार्य डॉ. बी. यु. माने, डॉ. एस. एच. झगडे यांचे मार्गदर्शनाखाली सदर कोर्सवर्क यशस्वीपणे राबविला गेला.

सदर समारोप कार्यक्रमासाठी डॉ. एस. एच. झगडे, डॉ. एन.एस. गिरी, डॉ. एन. आर. कांबळे, प्राध्यापक व विध्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संदीप राठोड यांनी, प्रा. जी. एम. अहिवळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला तर आभार प्रदर्शन डॉ. शितल कल्हापूरे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# जैन कासार समाज संस्थेच्या मुख्य कार्यालयाचे उद्घाटन

## अध्यक्ष विजयअण्णा कासार यांचे मोठे योगदान



**ज्योतिर्मय साहित्य**

सांगली - दिगंबर जैन कासार समाज संस्थेच्या सांगली येथे उभारण्यात आलेल्या अस्मितेचे, एकतेचे आणि वैभवाचे प्रतीक असलेल्या मुख्य कार्यालयाचे उद्घाटन स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक महाराज कोल्हापूर यांच्या शुभहस्ते व जैन सिद्धांत प्रसारक मंडळाचे जीवनदादा पाटील, द. भारत जैन सभेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील, उपाध्यक्ष रावसाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पोपटलाल डोर्ले यांच्या अध्यक्षतेखाली झाले. व्यासपीठावर संघटक सुभाष दगडे, सुहास काटकर, प्राचार्य अशोक साळवी यांची उपस्थिती होती.

प्रारंभी महिला अध्यक्षा प्रभा मांगले यांनी मंगलाचरण म्हटले. दीपप्रज्वलन झाल्यानंतर संस्थेचे शिष्यवृत्ती फंड प्रमुख अशोक साळवी व पुणे जिल्हाध्यक्ष उदय लेंगडे यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार झाला. तद्नंतर स्व. अप्पासो अण्णाप्पा कासार बेनाडीकर सभागृहात उद्घाटन झाले.

संस्थेचे कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर (सोलापूर) यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांचा आढावा घेत प्रास्ताविक केले. दुरुगकर म्हणाले, अध्यक्ष विजयअण्णा कासार यांच्या प्रयत्नातून व सततच्या पाठपुरावामुळे हे कार्यालय उभे राहिले आहे. आर्थिक योगदानात त्यांच्या कुटुंबांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे संस्थेचे स्वमालकीच्या जागेत आज कार्यालय सुरू झाले आहे. लक्ष्मीसेन महाराज यांनी आदर्श संस्थेची पंचसूत्री सांगून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पोपटलाल डोर्ले यांचा मठाच्या वतीने गौरव केला.

यावेळी बोलताना डोर्ले म्हणाले, जैन कासार संस्था केवळ नावाला नसून सेवा हाच धर्म मानून अविरत कार्य करणारी एक जागृत संस्था आहे. हे कार्यालय केवळ एक वास्तू नसून आपल्या समाजाच्या प्रगतीचे आणि भविष्यातील स्वप्नांचे हक्काचे केंद्र आहे. यासाठी अध्यक्ष विजयअण्णा कासार यांचे योगदान संस्था कधीच विसरू शकणार नाही. येथून आता समाजाच्या उन्नतीसाठी विचार मंथन होईल.

शुभेच्छा देताना जैन आर्थिक महामंडळाचे सदस्य रावसाहेब पाटील म्हणाले, अल्पावधीतच संस्थेने खुप प्रगतीचे टप्पे गाठले आहेत. जैन समाजाने आपल्याच समाजातील अनेक गरजू, होतकरू तरुण-तरुणींना आणि लहान व्यवसायिकांना आर्थिक पाठबळाची खूप मोठी गरज आहे. हीच गरज ओळखून आपल्या मदतीसाठी जैन आर्थिक विकास महामंडळ खंबीरपणे उभे राहिले आहे. शिक्षणासाठी कर्ज, नव्या व्यवसायासाठी कमी व्याजदर आणि सुलभ अटी आहेत. केंद्र व राज्य सरकारने निधी उपलब्ध करून दिला असून याचा लाभ तळागाळातील बांधवांनी घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी कार्यालय उभारणीसाठी योगदान दिलेल्या देणगीदारांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे महाराष्ट्र राज्यातील कार्यकर्ते सोलापूरच्या उपाध्यक्ष नीताताई मंकणी, हुकूमचंद हेसे, बाबुराव तंगा, परभणीचे विलास वानरे, अनंत विश्वंभर, हिंगोलीचे प्रशांत कंधारकर, अमरावतीचे संजय जैन, रत्नागिरीचे अशोक मोहिरे, अजित शिराळकर, प्रभा मांगले, लातूर जिल्हाध्यक्ष नेमिनाथ विभुते, इचलकरंजीचे सुकुमार पोते, पुणे येथील उदय लेंगडे, मोतीलाल वणकुद्रे, दीपक डोर्ले आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महावीर मांगले, नितीन मांगले आदींनी विशेष परिश्रम घेतले. विलास वानरे यांनी आभार मानले.

# मोहितेमळा शाळेचा रक्षाबंधन निमित्त विशेष उपक्रम



**ज्योतिर्मय साहित्य**

मोहितेमळा शाळेत विविध उपक्रम आयोजित केले जातात. त्यामध्ये रक्षाबंधन निमित्त आयोजित केलेला राख्या तयार करणे हा एक आगळावेगळा उपक्रम होता. कारण इयत्ता पहिली ते चौथी मध्ये शिकणाऱ्या बालचमुनी स्वतः राख्या बनवल्या आणि तयार केलेल्या राख्या देश सेवा करणाऱ्या वीर जवानांसाठी पाठवण्यात आल्या.

त्याचबरोबर बालसुधारगृहातील मुलांसाठीही राख्या पाठवण्यात आल्या. यामधून त्यांच्यामध्ये कला, कार्यानुभव हस्तकला याबरोबर आपण माणूस म्हणून कसं जगावं याचाही धडा मिळणार आहे. देशभक्ती आणि संवेदनशीलता जागी होणार आहे.त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013


## टीका करणाऱ्यांना उत्तर यशाने द्या

आयुष्यात आपण काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न केला की टीका करणारे हमखास भेटतात.
तू हे करू शकणार नाहीस... तुझ्याकडून काही होणार नाही... तुझी परिस्थिती बघ... तू आधी स्वतःला सिद्ध कर... अशी वाक्यं ऐकताना मन दुखतं. कधी राग येतो. कधी स्वतःवरच शंका येते. आणि कधी वाटतं- "यांना आत्ताच उत्तर द्यावं!"
पण थांबा... प्रत्येक शब्दाला शब्दांनी उत्तर देण्याची गरज नसते.
काही उत्तरं वेळेवर सोपवलेलीच चांगली असतात. कारण तोंडाने दिलेलं उत्तर काही मिनिटं टिकतं... पण यशाने दिलेलं उत्तर वर्षानुवर्षं बोलत राहतं.
एका गरीब मुलाला मोठं होऊन अधिकारी व्हायचं होतं. त्याच्या घरची परिस्थिती साधी होती.
लोक त्याला म्हणायचे, "तुझ्या घरातून आजपर्यंत कुणी मोठं झालं नाही; तू काय करणार?"
तो काहीच बोलायचा नाही. फक्त अभ्यास करायचा. दिवस-रात्र मेहनत करायचा.
कधी अपयश आलं. कधी पैशांची अडचण आली. कधी स्वतःवरचा विश्वासही डळमळला.
पण त्याने एक गोष्ट केली- त्याने टीकेला उत्तर देण्यासाठी वेळ वाया घातला नाही; त्याने स्वतःला घडवण्यासाठी वेळ दिला. वर्षांनी त्याची निवड झाली. निकालाच्या दिवशी त्याच्यावर टीका करणारे अनेक लोक त्याला शुभेच्छा देण्यासाठी आले. त्याने कुणालाही जुने शब्द आठवून दिले नाहीत. तो फक्त हसला. कारण त्याला माहीत होत ज्यांना उत्तर द्यायचं होतं, त्यांना त्याचं यश आधीच उत्तर देऊन गेलं होतं. आयुष्यात टीका नेहमी वाईट नसते. काही टीका आपल्याला सुधारण्यासाठी असते. आई-बाबा आपली चूक सांगतात... शिक्षक आपली कमतरता दाखवतात... जवळची माणसं आपल्याला योग्य मार्ग दाखवतात.
अशी टीका स्वीकारायला शिका.
पण जी टीका तुमचं मन तोडण्यासाठी केली जाते, जी तुमच्या स्वप्नांची खिल्ली उडवते, जी तुम्हाला खाली खेचण्यासाठी केली जाते- तिचं ओझं मनावर घेऊ नका. तुमचं काम आहे स्वतःला सिद्ध करणं. लक्षात ठेवा...
टीका करणाऱ्यांच्या आवाजापेक्षा तुमच्या मेहनतीचा आवाज मोठा करा. आज लोक तुमच्यावर हसतील.
उद्या कदाचित तुमच्याकडून प्रेरणा घेतील.
आज तुमच्या स्वप्नांवर प्रश्नचिन्ह लावतील.
उद्या तुमच्या यशाची उदाहरणं देतील.
आज तुमची किंमत कमी समजतील.
उद्या तुमच्या एका शब्दासाठीही थांबतील.
पण त्यासाठी एकच अट आहे-
तुम्ही थांबता कामा नये.टीका करणाऱ्यांना उत्तर देण्यासाठी आवाज वाढवू नका; स्वतःची उंची वाढवा. कारण शब्दांनी दिलेलं उत्तर काही क्षणांचं समाधान देतं, पण यशाने दिलेलं उत्तर आयुष्यभर लक्षात राहतं. आज ज्यांनी तुम्हाला कमी लेखलं, त्यांच्यामुळे स्वतःला कमी समजू नका. त्यांच्या शब्दांना अश्रू बनवू नका-तेच तुमच्या जिद्दीचं इंधन बनवा.जेव्हा तुम्ही टीकाकारांच्या टोमण्यांचे रूपांतर आपल्या यशाच्या महालात कराल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल.टीकाकारांच्या वावड्यांकडे लक्ष देऊ नका. गरुडाप्रमाणे वादळाच्या वर उडा. शब्दांचा खेळ थांबवा, यशाची उत्तुंग शिखर गाठा... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात महाविजयाचे सुवर्ण छत्रपती व्हा!

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495





## आतुरता कृष्णजन्माची.....

आणि म्हणूनच देवकी त्यांना म्हणते-
सत्वम साक्षाद् विष्णुरध्यात्मदीपः।
"तूच माझ्या अंतःकरणातील अध्यात्माचा दीप आहेस." ही ओळ संपूर्ण स्तुतीचा केंद्रबिंदू आहे.
भगवान बाहेर जन्मले, ही लीला आहे;
पण भगवान अंतःकरणात प्रकट झाले, ही साधनेची सिद्धी आहे.
श्रीमद्भागवताच्या याच अध्यायात पुढे देवकीची एक विलक्षण प्रार्थना येते -"माझ्या उदरातून तुझा जन्म झाला हे कंसाला कळू नये", आणि त्यानंतर भगवान स्वतः देवकी-वसुदेवांना त्यांच्या पूर्वजन्मातील पृश्नि-सुतपा तपश्चर्येची आठवण करून देतात. त्यामुळे ही जन्मकथा प्रत्यक्षात भगवान, माया, कर्म, भक्ती आणि पुनर्जन्म यांना जोडणारी अत्यंत गहन कथा बनते.
"कृष्णाचा जन्म मथुरेत झाला; पण कृष्णतत्त्वाचा जन्म आपल्या अंतःकरणात कधी होतो?"जेव्हा देहापेक्षा आत्मा, सुखापेक्षा सत्य, अहंकारापेक्षा शरणागती आणि मृत्यूच्या भयापेक्षा भगवदाश्रय मोठा वाटू लागतो-तेव्हा आपल्या अंतःकरणात श्रीकृष्णजन्म होतो. 🙏

जय जय रघुवीर समर्थ 🙏
कृतज्ञ मी कृतार्थ मी 🙏
भगवंत हृदयस्थ आहे 🙏
अपर्णा परांजपे कात्रज पुणे



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## काका (कुटुंबाचा भक्कम आधारस्तंभ)

'नात्यांचं महावस्त्र' या लेखमालेचे आतापर्यंत आठ भाग झाले आहेत. त्यात पहिली सुरुवात अर्थातच विश्वातील सर्वात महत्त्वाचे नाते म्हणजे आईपासून झाली. नंतर क्रमाक्रमाने बाबा, आजी, आजोबा, मामा, मावशी आणि आत्या या नात्यांचा विस्तार आपण पाहिला. हे सगळे नात्यांचे एकेक रेशमी पदर आहेत. ते उलगडण्याचा आणि त्यांची झळाळी दाखवण्याचा आपण प्रयत्न केला. असाच एक समृद्ध पदर म्हणजे काका. त्यांच्याबद्दलच आज जाणून घेऊ या.
'काका' म्हटलं की वडिलांसारखीच माया करणारी एक प्रेमळ व्यक्ती डोळ्यांसमोर येते.
पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. घरात अनेक माणसे असत. त्यात वडील, काका आदी मायेची माणसे एकत्र असत. एकत्र शेती करणे, व्यवसाय करणे, आई-वडिलांकडे लक्ष देणे या गोष्टी ते आपुलकीने करीत असत. कधी आवश्यकतेनुसार एखादा भाऊ नोकरीनिमित्त शहरात गेला, तर दुसरा भाऊ शेती किंवा व्यवसाय सांभाळत असे; पण त्यांच्या प्रेमात कधी अंतर पडत नव्हतं. अशा वेळी काकांचं हे नातं रक्ताच्या पलीकडे जाऊन प्रेम, कर्तव्य आणि माणुसकी यांचं सुंदर प्रतीक बनतं. अशी नाती कुटुंबाला समृद्ध बनवतात. (क्रमश:)

# माणुसकीची ज्योत बनून जगलेल्या करुणामूर्ती मदर तेरेसा

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतरही त्यांच्या जीवनशैलीत कोणताही मोठा बदल झाला नाही. प्रसिद्धीच्या झोतात असतानाही त्या पूर्वीप्रमाणेच साध्या राहिल्या आणि सेवेला प्राधान्य देत राहिल्या.

मदर तेरेसा भारतात आल्या आणि भारतालाच त्यांनी आपले कर्मभूमी मानले. त्यांनी भारतीय नागरिकत्व स्वीकारले आणि आपले संपूर्ण कार्य भारतातील गरीब आणि वंचितांसाठी वाहिले. त्यांच्या कार्यामुळे कलकत्ता हे शहर जगाच्या मानवतावादी नकाशावर एका वेगळ्या अर्थाने प्रसिद्ध झाले. त्यांच्या साध्या पांढऱ्या-निळ्या साडीतील प्रतिमेतून जगाला भारतातील सेवाभावाची एक वेगळी ओळख मिळाली.

भारत सरकारनेही त्यांच्या कार्याचा गौरव केला. १९८० मध्ये त्यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात आला.

त्यांच्या कार्यावर टीकाही झाली इतिहासातील कोणतेही मोठे व्यक्तिमत्त्व टीकेपासून पूर्णपणे अलिप्त राहिलेले नाही. मदर तेरेसा यांच्या संस्थांमधील वैद्यकीय सुविधा, वेदनाशमन आणि काही सामाजिक-धार्मिक भूमिकांबाबतही विविध काळात टीका झाली. नोबेलच्या अधिकृत चरित्रातही त्यांच्या कार्यावर काहीनी आक्षेप घेतला पण त्यांचा आयुष्याचा मध्यवर्ती संदेश, दुर्लक्षित माणसाकडे माणूस म्हणून पाहणे हा जगभरात प्रभावी ठरला.



हळूहळू त्यांचे वय वाढले, प्रकृती खालावत गेली,तरीही त्यांनी सेवा थांबवली नाही. जगभर प्रवास करून त्यांनी सेवाकार्याचा विस्तार केला. त्यांची संस्था विविध देशांमध्ये कार्यरत झाली.

५ सप्टेंबर १९९७ रोजी कलकत्ता येथे मदर तेरेसा यांचे निधन झाले. भारत सरकारने त्यांच्यावर राजकीय इतमामात अंत्यसंस्कार केले. त्यांच्या पार्थिवाचे अंतिम संस्कार झालेले ठिकाण आजही श्रद्धेचे आणि प्रार्थनेचे स्थान आहे.

त्यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य थांबले नाही. त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून जगभरातील सेवाकार्य पुढे सुरू राहिले.

मदर तेरेसा यांच्या कार्याला कॅथोलिक चर्चनेही मोठा सन्मान दिला. १९ ऑक्टोबर २००३ रोजी त्यांना धन्य घोषित करण्यात आले आणि ४ सप्टेंबर २०१६ रोजी पोप फ्रान्सिस यांनी त्यांना संत म्हणून घोषित केले. त्यांचे अधिकृत नाव सेंट तेरेसा ऑफ कलकत्ता झाले.




मोठ्या भाषणांनी, मोठ्या घोषणांनी किंवा केवळ पैशांनी माणुसकी सिद्ध होत नाही. एखाद्या दुःखी माणसाच्या जवळ बसणे, त्याचे दुःख ऐकणे, भुकेल्याला अन्न देणे, आजारी व्यक्तीला आधार देणे, निराधाराला आपलेपण देणे यामध्ये माणुसकीचा खरा अर्थ दडलेला आहे आणि हेच कार्य त्या आयुष्यभर करत राहिल्या.

मदर तेरेसा यांचे संपूर्ण आयुष्य याच विचाराचे जिवंत उदाहरण होते.

त्या म्हणत असत की, जग बदलण्यासाठी प्रत्येक वेळी मोठी कामे करण्याची गरज नसते, लहान कामेही मोठ्या प्रेमाने करता येतात. त्यांच्या जीवनातील हीच साधी शिकवण आजही लाखो लोकांना प्रेरणा देते.

२६ ऑगस्ट हा केवळ मदर तेरेसा यांचा जन्मदिवस नाही,तो माणुसकीची आठवण करून देणारा दिवस आहे.

एका छोट्याशा व्यक्तीने आपल्या छोट्याशा हातांनी जगातील असंख्य दुःखी माणसांना आधार दिला.त्यांच्याकडे सत्ता नव्हती, संपत्ती नव्हती,पण त्यांच्याकडे होते करुणेचे हृदय आणि सेवाभावाची अमर ज्योत. मदर तेरेसा यांचे आयुष्य आपल्याला सांगून जाते की ''माणूस किती मोठा झाला यापेक्षा, त्याने किती माणसांना आधार दिला ?हे अधिक महत्त्वाचे आहे.''

आणि म्हणून, मदर तेरेसा आज शरीराने आपल्यात नसल्या, तरी त्यांनी पेटवलेली माणुसकीची ज्योत अजूनही जगाच्या अंधारात प्रकाश देत आहे.

स्व.मदर तेरेसा यांना जयंती निमित्त त्यांना विनम्र आदरांजली

# सुनांना मुलींचे स्थान कधी मिळणार?

**ज्योतिर्मय साहित्य**

हे अगदी खरेच आहे. पण ज्यांचे लग्न झालेले आहे असे पतीपत्नी एकाच घरात राहून पतीपत्नीसारखे वागतात का?

ते फक्त पैशाच्या मागे लागलेले आहेत. मोबाईलच्या मागे लागलेले आहेत.

आपला स्वतःचा संसार, बायको हिला ते किती वेळ स्वःहून आणि मनापासून देतात?

फक्त दुसर्याची मुलगी लग्न करुन घरी आणली की, त्यांची जबाबदारी संपते. तिच्या वैयक्तिक

मानसिक गरजा जांचा ते कधी विचार करतात कां?ती आपले घरदार सोडून पती नावाच्या माणसाबरोबर आलेली असते. आता तिची सर्व जबाबदारी तिच्या पतीवर असते. पण काही अहंकारी लोक सुनेला तिचा हक्क, दर्जा देत नाहीत, मुलाला सुद्धा समजावत नाहीत की, तू तुझ्या पत्नीला स्वतः हून वेळ दे, तिला हवे नको ते बघ. तिच्या मनाचा जरातरी विचार कर. काही सासरची माणसे, आईवडील मुलांना त्याबाबतीत मागे खेचायला मदत करतात. घरच्या जबाबदारीत मुलाला असे अडकवून ठेवतात की, मुलाची पत्नीशी, बोलण्याची, तिला भेटण्याची इच्छाच मरून जाते. जो मुलगा मुलीला फोटो पाहून क्षणार्धात पसंत करतो. तिला पाहिल्यावर, घरच्या सर्व मन्डळीसहित सर्व होकार देतात, लवकरात लवकर मुहूर्त काढून लग्न विधिवत पार पडते, आणि थोड्याच दिवसात मुलाचा मुलीबद्दल इन्ट्रेस संपतो, आईवडील मुलीच्या तक्रारी करु लागतात, मुलगाही बायकोकडे दुर्लक्ष करु लागतो. ती मुलगी त्या घरात पती समोर असुनही नुसतीच एकाकी रहात असते. त्या दोघांच्या नात्याला काहीच अर्थ नसतो. मग अशावेळी मुलींनी काय करावे? माहेरी सांभाळायला कोणीच नसते, नुसते मोठे घर, खाण्यापिण्याची ददात नाही, कपडालत्ता दागिने सर्व आहे, पण जर पतीचे प्रेमच मिळत नसेल तर मुलीचे आयुष्य नरक बनून जाते.

ऐन पस्तीशीच्या काळात जर अशी परिस्थिती त्या मुलीवर आली तर तिने काय करायचे? बरे मुलीत शिक्षण, रुप, संस्कार सर्व असून काही उपयोग नाही, कारण घरच्या माणसांना त्यांचे घर सांभाळणारी मुलगी पाहिजे होती, तिला मन, तिचे




विचार, कल्पना, स्वप्न, संसार याचा काही विचारच नसतो.

अशा कुटुंबात मुलगी देऊन मुलीच्या आईवडिलांची केवढी मोठी चूक घडते, ते कधीच स्वतःला माफ करु शकणार नाहीत.

मुलीच्या अश्रुंची किंमत ते कशी काय चुकविणार?बरे मुलगाही अतिउच्च सुशिक्षित असुनही त्याला इतक्या साध्या जनरल गोष्टी कळू नये हा मोठा प्रश्न आहे.

अशी किती अविचारी कुटुंब आहेत की, ती मुलांची लग्न चांगल्या घरातल्या मुलींशी लावून देतात, पण मुलाला आपल्या ताब्यात इतके ठेवतात की, त्यांना स्वतः चा संसार सुखाने करण्यासाठी वेळच देत नाहीत, मुलीत काहीतरी कुस्पटे काढून तिला दोषी ठरवून मोकळे होतात, मग मुलालाही वाटते आपली पत्नी आपल्या आईवडिलांकडे लक्ष देत नाही. आणि हळूहळू तो पण आलिप्त होत जातो. दोघांचा संसार विस्कळित होतो, मग अशावेळी त्या मुलीने काय करावे. कारण तिला तिचा हक्काचा पतीच, जीवनसाथीच समजून घेत नसेल तर ती आतापासूनच एकटी पडते. मग आशा विवाहाला तरी काय म्हणावे. लग्न होऊनही जर असे एकटेच रहाणे अनेक मुलींच्या वाट्याला येत असेल तर तिच्या संसाराला, त्या विवाहाला काय अर्थ उरतो?अशी खूप उदाहरणे आहेत.

दोन पिढ्यात, दोन ठिकाणच्या वातावरणात जर एकात्मता होऊ शकली नाही, सामंजस्य घडले नाही तर पुढे काय होणार?

आणि यांच्या मुलांचे भविष्यात काय हाल होणार?

याचा कोणी विचार केला आहे का?

समाजात या दोन्ही गोष्टीचा विचार करणे तितकेच आवश्यक आहे, नुसते लग्न लावले म्हणजे आईवडिलांचे कर्तव्य संपत नाही.

मुलीच्या आईवडिलांनीही आपल्या मुलीच्या संसाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे, नाहीतर अशा एकाकी मुली मानसिक आजाराला

बळी पडू शकतात.

कारण काही लोक तर मुलीच्या घरच्या माणसांची चौकशी करणे, भेटणे, बोलणे हे सारे बन्द करतात, व संपर्कासाठी कोणताच पर्याय ठेवत नाहीत.हे बरोबर वाटते का कां?

बघा विचार करुन.

# शब्दकोशाच्या रूपाने त्या आपल्यात आहेतच...

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

प्रा.यास्मिन शेख लिहितात, ''बोलीभाषांचे महत्त्व मला मान्य आहे. ललित साहित्याला त्यामुळे प्रादेशिक डूब मिळून एक सच्चेपणा, एक जिवंतपणा येतो; पण औपचारिक, शास्त्रीय, नियतकालिकातील वृत्तलेखन, शासन व्यवहारातील मराठी लेखन व एरवीही जिथे निवेदन असेल, तिथे प्रमाण भाषेचाच वापर हवा. नाहीतर लेखकाला नेमके काय म्हणायचे आहे, ते समस्त मराठी जणांना कसे कळणार ? बोलीभाषेतील साधारण आशय संदर्भाने कळेलही, पण त्या आकलनात नेमकेपणा कसा येणार? प्रमाणभाषा जपली नाही, तर भाषेच्या क्षेत्रात अनागोंदी माजेल.''

पुढे त्या म्हणतात, ''शुद्धलेखनाचे व विशेषतः ऱ्हस्व-दीर्घाबद्दलचे काही नियम बदलायचे असतील, तर त्यानुसार अधिकृतरित्या नियमांमध्ये अवश्य बदल करा ,पण जोवर तसे होत नाही, तोवर सध्याचे शासनमान्य अठरा नियम आपण पाळलेच पाहिजेत .''भाषाविषयक विचार मांडताना त्या म्हणतात, ''प्रमाण भाषेचा उपहास आणि वेगवेगळ्या स्थानिक बोलीभाषांचा हिरिरीने पुरस्कार करण्याचे दिवस आहेत,पण खरे सांगायचे तर, प्रमाणभाषा की बोलीभाषा हा वाद फसवा आहे, कारण दोन्हींना आपापले स्वतंत्र स्थान आहेच.''

लेखनविषयक नियमांबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना प्रा.शेख लिहितात,



''मराठीच्या लेखनात एकवाक्यता व एकसूत्रीपणा यावा व शासकीय लेखन व्यवहारात मराठीचा वापर अचूकपणे व सुलभपणे करता यावा म्हणून महाराष्ट्र शासनाने महामंडळाकडे मराठी लेखनासंबंधी नियम निश्चित करण्याचे काम सोपविले... हे लेखनविषयक नियम मराठीचे लेखन करणाऱ्या सर्वांना बंधनकारक आहेत. मराठीचे लेखन या नियमांनुसार करणे अपेक्षित आहे आणि आवश्यकही आहे.''





प्रा. शेख आपल्या विवेचनात स्पष्ट करतात की,''प्रमाण मराठी भाषेचे लेखनविषयक नियम सर्वांनीच आत्मसात केले पाहिजेत. ''प्राध्यापक यास्मिन शेख यांनी २१ जून २०२४ रोजीवयाच्या ९९ वर्षात पदार्पण केले, हे औचित्य साधून त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने सुप्रसिद्ध लेखक श्री. भानू काळे आणि श्री. दिलीप फलटणकर यांनी यास्मिन शेख: मूर्तिमंत मराठीप्रेम हा गौरव ग्रंथ संपादित केला. मातृभाषेवर प्रेम करणाऱ्या आणि मातृभाषेप्रती आपुलकी असलेल्या अन्य व्यक्तींनाही हा गौरवग्रंथ अतिशय प्रेरक ठरणारा आहे. आपल्यासाठी पहिला शब्द लेखन कोश उपलब्ध करून देणाऱ्या भाषातज्ज्ञ यास्मिनताईंची जडणघडण आणि त्यांची व्यक्तिपैलू उमजून घेण्यासाठी हा ग्रंथ मराठी साहित्यात मौलिक भर घालणारा आहे. प्रत्येकाकडे हा ग्रंथ संग्रही असावाच.

प्रा. यास्मिन शेख यांनी साजरा केलेला हा शतक महोत्सव, केवळ त्यांच्या दीर्घायुष्यासाठीच नव्हे, तर भाषाविषयक तपश्चर्येसाठीही अभिवादन करण्याचा एक संस्मरणीय प्रसंग. ''प्रमाणभाषा जपली जावी म्हणून आजच्या पिढ्यांना आणि पुढच्या अभ्यासकांना त्यांच्या लेखनातून, विचारांतून आणि कृतीतून प्रेरणा मिळत राहोत.

(डॉ.नागेश अंकुश यांनी लिहिलेल्या 'मागोवा-प्रमाण मराठी भाषेच्या निर्दोष (प्रमाण )लेखनाचा इतिहास' या पुस्तकातून...)

## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग-१)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३



## पुराणांची पार्श्वभूमी व हिंदू धर्मातील स्थान

भारतीय ज्ञानपरंपरेचा विचार करताना वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आणि पुराणे हे परस्परांपासून पूर्णतः अलग असे ग्रंथसमूह नसून एका विशाल सांस्कृतिक व वैचारिक परंपरेचे विविध प्रवाह आहेत. त्यापैकी पुराणांना विशेष महत्त्व आहे, कारण पुराणांनी केवळ धार्मिक आख्यायिका सांगितल्या नाहीत, तर भारतीय समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे, विश्वकल्पनेचे, वंशपरंपरांचे, तीर्थक्षेत्रांचे, धर्मविचारांचे आणि जीवनमूल्यांचे जतन करण्याचे कार्य केले.

'पुराण' या शब्दाचा मूलार्थ प्राचीन किंवा पूर्वकालीन ज्ञानाशी संबंधित आहे. तथापि, पुराण म्हणजे केवळ प्राचीन कथा असा त्याचा अर्थ घेणे चुकीचे ठरेल. पुराणे ही भारतीय समाजाच्या अनेक पिढ्यांना धर्म, नीती, इतिहासपरंपरा, विश्वरचना आणि जीवनदृष्टी समजावून सांगणारी व्यापक ज्ञानपरंपरा आहे.

हिंदू धर्मात पुराणांना वेदांप्रमाणे 'श्रुती'चा दर्जा नाही. पुराणे ही 'स्मृती'परंपरेचा भाग मानली जातात, त्यामुळे त्यांचे स्वरूप वेदांपेक्षा वेगळे आहे. वेदांमध्ये मंत्र, यज्ञ, तत्त्वचिंतन आणि आध्यात्मिक ज्ञानाची मूलभूत मांडणी आढळते; उपनिषदांमध्ये त्या ज्ञानाचे तात्त्विक परिशीलन होते; तर पुराणे त्याच व्यापक सांस्कृतिक व धार्मिक विचारांना कथा, संवाद, आख्यान आणि उदाहरणांच्या माध्यमातून सामान्यांपर्यंत पोहोचवतात. यामुळे पुराणांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची लोकाभिमुखता. ज्या तत्त्वांचा बौद्धिक किंवा तात्त्विक विचार वेद-उपनिषदांत आढळतो, तेच विचार पुराणकथांच्या माध्यमातून अधिक सहज, रोचक आणि स्मरणीय स्वरूपात मांडले जातात. देव-देवतांच्या कथा, ऋषी-मुनींचे संवाद, राजवंशांची वर्णने, सृष्टीची उत्पत्ती, प्रलय, मन्वंतर, तीर्थे, व्रते आणि धर्माचरण यांमधून एका व्यापक जीवनदृष्टीची निर्मिती होते.

पुराणांचे स्वरूप समजून घेण्यासाठी त्यातील पंचलक्षणे ही संकल्पना विशेष महत्त्वाची आहे. पारंपरिक दृष्टिकोनानुसार पुराणामध्ये पाच प्रमुख विषयांचा समावेश असतो, सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर आणि वंशानुचरित. ही पंचलक्षणे केवळ एका पुराणापुरती मर्यादित नसून मत्स्यपुराण, विष्णुपुराण, वायुपुराण आदी पुराणपरंपरेतील ग्रंथांमध्ये त्यांचा उल्लेख आढळतो. (क्रमश:)

# कहीं दूर जब दिन ढल जाए

**ज्योतिर्मय साहित्य**

हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील काही जुनी गाणी अशी आहेत की, ती ऐकताना आपण केवळ गाणे ऐकत नाही, तर त्या गीतामधील भावना जगू लागतो, त्या गाण्या सोबत आपणही कधी

गुणगुणायला लागतो ,ते

आपलं आपल्यालाच

कळत नाही.

असंच माझं एक आवडतं गाणं म्हणजे मुकेश यांनी

गायलेले ''कहीं दूर जब दिन ढल जाए'' हे होय.

१९७१ मध्ये ऋषिकेश मुखर्जी दिग्दर्शित व प्रदर्शित झालेल्या 'आनंद' या चित्रपटातील हे गीत आहे. गीतकार योगेश, संगीतकार सलील चौधरी आणि गायक मुकेश हे

होते. हे गीत चित्रपटातील राजेश खन्ना यांच्या व्यक्तिरेखेवर चित्रित झाले आहे. ''कहीं दूर जब दिन ढल जाए, साँझ की दुल्हन बदन चुराए

दिवस मावळतीला जातो आहे. संध्याकाळ अलगद उतरते आहे. या निसर्गचित्रातून गीतकार योगेश मनाच्यावेगळ्याच विश्वात आपल्याला घेऊन जातात. 'सांझ की दुल्हन' ही कल्पना अत्यंत सुंदर आहे. संध्याकाळेला नववधूचे रूप देऊन तिचे लाजरे, हळुवार आगमन दाखवले आहे. बाहेरचा दिवस संपत असताना मनात मात्र आठवणींचे दिवे उजळू लागतात.

''मेरे खयालों के आँगन में,
कोई सपनों के दीप जलाए''

ही ओळ या गीताचे भावविश्व आणखी गहिरे करते. बाहेर अंधार वाढत असताना मनाच्या अंगणात मात्र स्वप्नांचे दिवे पेटतात. एकटेपणात माणूस आठवणींच्या कप्प्यातील अश्याच सुंदर आठवणी आठवतो , कल्पनांच्या सोबतीने जगतो, ही भावना येथे अत्यंत हळुवारपणे व्यक्त झाली आहे.

गीताचा पुढील भाग अजूनच अंतर्मुख करणारा आहे. माणूस गर्दीत असूनही कधी कधी मनाने एकटा असतो. कुणीतरी आपल्याजवळ असावे, आपल्याला समजून घ्यावे, आपल्याला स्पर्शून जावे अशी एक अनामिक ओढ मनात निर्माण होते.

या भावनेला मुकेशजींच्या आवाजाने विलक्षण परिणामकारकता दिली आहे.

त्यांच्या आवाजातील हळवेपणा, किंचित छोटी कंप आणि खोल दुःख गीताला केवळ संगीत न ठेवता भावनिक बनवते.

या गाण्यात आठवणींचे प्रेम, विरहाची वेदना, एकटेपणाची जाणीव, अनामिक ओढ आणि मनात ,हृदयात कुठेतरी जपून ठेवलेली एखादी प्रिय व्यक्ती आहे.

म्हणूनच हे गीत ऐकताना प्रत्येकाला आपल्या आयुष्यातील एखादी व्यक्ती, एखादा प्रसंग किंवा एखादी संध्याकाळ आठवू शकते.

'आनंद' चित्रपटातील आनंद ही व्यक्तिरेखा आयुष्यावर मनापासून प्रेम करणारी आहे; पण तिच्या आयुष्यावर मृत्यूची सावली आहे.

या पार्श्वभूमीवर हे गीत अधिक अर्थपूर्ण होते.


दिवस मावळणे म्हणजे केवळ संध्याकाळ होणे नाही, ते आयुष्याच्या मावळतीचेही प्रतीक



बनते.

म्हणूनच या गीतात एक विलक्षण द्वंद्व जाणवते.

एका बाजूला जगण्याची सुंदर स्वप्ने आणि दुसऱ्या बाजूला आयुष्य संपत असल्याची जाणीव. किती विलक्षण विरोधाभास ना हा ?




राजेश खन्ना यांच्या चेहऱ्यावरील भाव आणि मुकेशजींच्या आवाजातील वेदना यांचा सुंदर मेळ या गीताला अविस्मरणीय बनवतो. हे गीत राजेश खन्ना यांच्यावर चित्रित झाले असून अमिताभ बच्चनही काही दृश्यांत पार्श्वभूमीत दिसतात.

या गीताचे संगीतकार सलील चौधरी यांनी गीताच्या भावनेला साजेसे अत्यंत सुंदर संगीत दिले आहे.

संगीतात कुठेही अनावश्यक गाजावाजा नाही. त्यामुळे शब्द आणि आधीच सुंदर असलेला मुकेशजींचा आवाज आणखी श्रवणीय झाला आहे.

विशेष म्हणजे या गीताची चाल मूळात सलील चौधरी यांनी पूर्वी रचलेल्या एका बंगाली गीताशी संबंधित होती.

या गीताचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे मुकेशजींचा आवाज. मुकेश यांचा आवाज ऐकताना असे वाटते की एखादा अत्यंत जवळचा माणूस आपल्या मनातील दुःख आपल्याशी अलगद बोलून दाखवत आहे.

त्यांच्या आवाजात आक्रोश नाही, दिखाऊ दुःख नाही .आहे ती फक्त मनाला भिडणारी शांत वेदना.

याच कारणामुळे ''कहीं दूर जब दिन ढल जाए'' हे गीत अनेक दशकांनंतरही तितकेच ताजे आणि हृदयस्पर्शी वाटते.

एकंदरीत हे गीत मावळत्या दिवसाचे गीत, एकाकी मनाचे, आठवणींचे अपूर्ण प्रेमाचे आणि आयुष्याच्या क्षणभंगुरतेची जाणीव करून देणारे गीत आहे.

संध्याकाळ झाली की आकाशात हळूहळू अंधार पसरतो, पण या गीतामुळे मनाच्या आकाशात मात्र आठवणींचे दिवे उजळतात.

आणि म्हणूनच आजही मुकेशजींचा तो हळवा आवाज कानावर पडला की मन नकळत गायला लागते, कहीं दूर जब दिन ढल जाए, हो ना? आज २७ ऑगस्ट गायक मुकेश यांच्या ५० व्या स्मृती दिनानिमित्त त्यांना विनम्र आदरांजली !

****

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559